**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 09/09/2015 रोजी भरलेल्या माहे सप्टेंबर महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01.**<br>**दि. 09 सप्टेंबर 2015**<br><br>**निर्णय -** | प्रश्नोत्तरे<br><br>**<u>घेण्यात आली.</u>** |
| **विषय क्र. 2.**<br>**दि. 09 सप्टेंबर 2015**<br><br>**<u>ठराव क्र. 452.</u>**<br>**दि. 09 सप्टेंबर 2015**<br><br>**निर्णय -** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थितीदर्शक अहवालास मंजूरी मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 06/08/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1503/2015.<br><br>"नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 67 अे अन्वये, राज्य शासनाकडे पाठविण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी.<br><br>**<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 09 सप्टेंबर 2015**<br><br>**<u>ठराव क्र. 453.</u>**<br>**दिनांक 09 सप्टेंबर 2015**<br><br>**निर्णय -** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या सी विभाग वाशी विभाग कार्यक्षेत्रातील सेक्टर-30 व 30ए येथील दैनंदिन रस्ते सफाई व पावसाळापुर्व गटार सफाईची कामे समग्र पध्दतीने कंत्राटी तत्वावर करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/08/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/घकव्य/604/2015.<br><br>"नवी मुंबई महानगरपालिकेच्या सी विभाग वाशी विभाग कार्यक्षेत्रातील सेक्टर-30 व 30ए येथील दैनंदिन रस्ते सफाई व पावसाळापुर्व गटार सफाईची कामे प्रथम वर्षाकरीता (सन 2014-15) समग्र पध्दतीने कंत्राटी तत्वावर करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 60 लाख, 84 हजार, 442 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी.<br><br><u>मंजूर</u> |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 09 सप्टेंबर 2015** | नवी मुंबई महानगरपालिका नवीन मुख्यालय इमारतीमध्ये मे. थ्री.जी.इन्फ्रा नेटवर्कस् प्रा. लि., सी.बी.डी., नवी मुंबई यांना भाडेपटटयाने जागा उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/08/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/974/2015. |
| **<u>ठराव क्र. 454.</u>**<br>**दिनांक 09 सप्टेंबर 2015** | आयुक्तांचे दिनांक 04/09/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1094/2015 च्या पत्रामध्ये केलेले फेरबदल लक्षात घेता, नवी मुंबई महानगरपालिका नवीन मुख्यालय इमारतीमध्ये मे. थ्री. जी. इन्फ्रा. नेटवर्कस प्रा. लि., सी. बी. डी., नवी मुंबई यांना 18.71 चौ.फुट जागा वर नमुद केलेल्या बाजार मुल्य भाडे दराने निविदा न मागविता प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह दि. 01/01/2014 पासून प्रथम: 2 वर्षाकरीता व त्यानुसार मागील वर्षातील कामाची गुणवता लक्षात घेवून पुढील मुदतवाढ देण्याच्या अटीवर "परवानगी व अनुज्ञा" (Leave & Licence) तत्वावर जागा उपलब्ध करुन देण्यास व करारनाम्यातील अटी व शर्ती निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्त, यांना प्रदान करण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) व (ड) प्रमाणे, सुचविल्याप्रमाणे, कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | मंजूर |
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 09 सप्टेंबर 2015** | बेलापूर भवन येथील पहिला, सातवा व आठवा मजल्यावरील जागेच्या विनियोगाच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/08/2015 चे पत्र क्र. नमुंमपा /मालमत्ता /975 /2015. |
| **<u>ठराव क्र. 455.</u>**<br>**दिनांक 09 सप्टेंबर 2015** | बेलापूर भवन येथील पहिला, सातवा व आठवा मजल्यावरील जागेच्या विनियोगाच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. महासंचालक, राजमाता जिजाऊ मिशन बाल आरोग्य व पोषण मिशन, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र शासन यांनी मागणी केल्याप्रमाणे आठवा मजल्यावरील क्षेत्रफळ 261.35 चौ.मी. अथवा पहिल्या मजल्यावरील क्षेत्रफळ 261.35 चौ.मी. उर्वरीत रिक्त असलेली जागा चालु शिघ्र सिध्द गणक दराप्रमाणे भाडेतत्वावर देण्यास, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम व समिती कार्यालयाकरीता सातव्या मजल्यावरील 522.704 चौ.मी. (कार्यालय व समितीगृह) इतकी जागा उपलब्ध करुन देण्यास, अतिक्रमण विभाग हा नमुंमपाचे अखत्यारीत येत असल्याने |

| | |
|---|---|
| | सातव्या मजल्यावरील उर्वरीत 522.704 चौ.मी. इतकी जागा अतिक्रमण विभागात कार्यरत असलेल्या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचा-यांची बैठक व्यवस्थेकरीता विनामुल्य देणेस, आणि आठवा मजला 1045.408 चौ.मी. जागेसाठी पुनश्च भाडे निश्चित करुन जाहिर निविदा मागविण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) व (ड) प्रमाणे, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी.<br><br>मंजूर |
| **निर्णय -** | |

महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्ताकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी.

| **अ. क्र.** | **नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय** | **विषय क्र. व महिना** | **ठराव क्र. व दिनांक** | **अभिप्राय** |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. मुनावर महमद पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55, खैरणे येथील डॉ. भालेराव क्लिनिक पासुन ते खैरणे फुट ब्रीज पर्यंत हेव्ही डयुटी गटार बांधणे. | 6<br>सप्टेंबर | 456<br>09/09/2015 | मंजूर |
| 2. | **श्री. मुनावर महमद पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55, खैरणे, कोपरखैरणे सेक्टर 11 येथील अय्यपा मंदिर व सेंट जोसेफ चर्च समोरील रस्त्यावर नवीन एल.ई.डी. दिवाबत्ती लावणे. | 7<br>सप्टेंबर | 457<br>09/09/2015 | मंजूर |
| 3. | **श्री. मुनावर महमद पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55, खैरणे, कोपरखैरणे सेक्टर 11 येथील फुटपाथवर बसण्यासाठी बेंचेस बसविणे. | 8<br>सप्टेंबर | 458<br>09/09/2015 | मंजूर |
| 4. | **श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**<br>नेरुळ नगर हे फार मोठे शहर आहे. या शहरामध्ये एक लाखाहुन अधिक नागरिक राहात आहेत. नेरुळ विभाग कार्यालयामध्ये वेगवेगळया कामानिमित्त नागरिक ये-जा करीत असतात. नेरुळ विभाग कार्यालय हे छोटयाशा जागेमध्ये असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी नेरुळ विभाग कार्यालयाची स्वतंत्र भव्य अशी इमारत बांधण्याची आवश्यकता आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिका बांधकाम विभागामार्फत नेरुळ विभाग कार्यालयासाठी नवीन इमारत बांधणे. | 9<br>सप्टेंबर | 459<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 5. | **श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**<br>नेरुळगांव व परिसरासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातुन भाजी व मासळी मार्केट व्हावा यासाठी माजी नगरसेविका सौ. इंदुमती नामदेव भगत यांनी सिडको प्रशासनाकडून सेक्टर 20 येथे मार्केटसाठी भुखंड उपलब्ध करुन देण्यास पाठपुरावा केलेला होता. त्यानुसार सिडकोने मार्केटसाठी भुखंड देखिल दिलेला आहे. त्याचा करार देखील झालेला आहे. परंतु आजमितीस त्याठिकाणी मार्केट बांधण्यात आलेले नाही. म्हणुन भाजी व मासळी विकणारे नागरीक पदपथावर बसुन व्यवसाय करीत आहेत. नेरुळ नगराची लोकसंख्या पाहता मार्केट बांधण्याची आवश्यकता आहे. सिडकोने दिलेल्या भुखंडावर मार्केट बांधण्यास ठराविक लोक विरोध करीत असल्याने सदर ठिकाणचे मार्केट बांधण्यास दिरंगाई होत आहे. म्हणुन इतर ठिकाणी भुखंड उपलब्ध करुन भाजी व मासळी मार्केट नवी मुंबई महानगरपालिके मार्फत तात्काळ बांधणे. | 10<br>सप्टेंबर | 460<br>09/09/2015 | मंजूर |
| 6. | **श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**<br>नेरुळ गावातील व परिसरातील नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत शौचालय ब-याच वर्षापुर्वी बांधण्यात आलेली असल्याने आजमितीस त्या बांधकामाची अवस्था फार वाईट आहे. फक्त नावासाठी सुलभ शौचालय राहिलेली आहेत. कृपया टप्याटप्याने सदर शौचालय तोडून नवीन बांधणे. | 11<br>सप्टेंबर | 461<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 7. | **सौ. नंदा कुंदन काटे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 13, ऐरोली येथे सिडको निर्मित जलकुंभ आहे. या जलकुंभाची क्षमता आता अपुरी पडत आहे. 30 वर्षापुर्वीच्या या विभागात झपाटयाने वाढ झाली आहे. मोठया प्रमाणात घरांचा विस्तार झाला. 100 बेडचे मनपा रुग्णालय, दोन मजली विभाग कार्यालय, खाजगी रुग्णालय, खाजगी शाळा या ठिकाणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सहाजिकच पाण्याच्या मागणीमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे जलकुंभाच्या क्षमतेत सुध्दा वाढ झाली पाहिजे. त्यामुळे या ठिकाणी अधिक क्षमतेचे नविन जलकुंभ बांधणे. | 12<br>सप्टेंबर | 462<br>09/09/2015 | मंजूर |
| 8. | **सौ. नंदा कुंदन काटे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 13, ऐरोली येथे व्यायामशाळा व अभ्यासिका बांधणे. | 13<br>सप्टेंबर | 463<br>09/09/2015 | मंजूर |
| 9. | **श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या अतिक्रमणावर नियंत्रण ठेऊन करदात्या नागरिकांना मोकळे पदपथ आणि रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचा-याची दुसरी पाळी सुरु करणे. | 14<br>सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 10. | **श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाने वारसा हक्काने नावात बदल करण्यात येणा-या पाणी देयकाकरीता घेण्यात येणारी अनामत रक्कम आकारु नये | 15<br>सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 11. | **श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील पाळीव व इतर प्राण्यांच्या मृतदेहाच्या विल्हेवाटीसाठी दफनभुमी अथवा विदयुत दाहीनीची उपाययोजना करणे. | 16<br>सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 12. | **श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुळ गांवठाण व लगत असलेली घरे नागरीकांना घर बांधणे असेल तर महापालिकेची परवानगी घेत नाहीत. त्यामुळे महापालिकेचा महसुल मिळत नाही. जून्या घराची घरपटटी आकारताना घराचे मोजमाप असणे त्या आधारे घरपटटी सनद किंवा 8अ चा उतारा गृहीत धरुन त्यानुसार आपल्या नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | 17<br>सप्टेंबर | 464<br>09/09/2015 | मंजूर |
| 13. | **श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका स्थापन होऊन 33 वर्षे झाली असून राज्य शासनामार्फत नगररचनेचे अधिकार महानगरपालिकेस दिले आहेत. सिडकोने नवी मुंबई शहराचा विकास आराखडा हा 35 वर्षापुर्वी बनविला आहे. वास्तविक पाहता 20 वर्षानंतर शहराचा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा विकास आराखडा तयार करुन तो जाहिर करणे. | 18<br>सप्टेंबर | 465<br>09/09/2015 | मंजूर |
| 14. | **श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेला स्वच्छ भारत नागरी अभियाना अंतर्गत देशामध्ये 3 रा नंबर आला आहे. आपल्या महानगरपालिकेस प्रथम क्रमांक मिळणे करीता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात डेब्रीज मुक्त मोहीम राबविणे. | 19<br>सप्टेंबर | 466<br>09/09/2015 | मंजूर |
| 15. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>श्रमिकनगर, खैरणे एम.आय.डी.सी. येथील सांडपाणी वाहुन नेणारी गटारे बनविणे व श्रमिकनगर येथील पदपथ व रस्ते बनविणे. | 20<br>सप्टेंबर | 467<br>09/09/2015 | मंजूर |
| 16. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>पावणेगांव येथील अभ्यासिका इमारती मधील 1 ला मजल्यावर विदयार्थ्यांसाठी अभ्यासिका व वाचनालय सुरु करणे. | 21<br>सप्टेंबर | 468<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 17. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** श्रमिकनगर, खैरणे एम.आय.डी.सी. येथील अभ्यासिका इमारती मधील रात्र निवारा केंद्र बंद करुन गरीब मागासवर्गीय विदयार्थ्यांसाठी अभ्यासिका व वाचनालय सुरु करणे. | 22 / सप्टेंबर | 469 / 09/09/2015 | मंजूर |
| 18. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** नेरुळ, सेक्टर-16, 16ए व 18 येथील रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. ठिकठिकाणी मोठ-मोठे खडडे पडलेले आहेत. तरी नेरुळ सेक्टर 16, 16ए व 18 मधील रस्त्यांचे सर्वेक्षण करुन डांबरीकरण करणे. | 23 / सप्टेंबर | 470 / 09/09/2015 | मंजूर |
| 19. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** नेरुळ, सेक्टर-16 येथील सी ब्रीज टॉवरच्या पाठीमागील आणि पामबीच लगतच्या सर्विस रोडला मॉर्निंग वॉक आणि ईव्हिनिंग वॉकसाठी लोकांची गर्दी असते. जॉगींग ट्रक व फुटपाथ नसल्यामुळे हे लोक सर्व्हिस रोडवर वॉक करतात. त्यामुळे अपघात होतात. म्हणुन त्या ठिकाणी जॉगींग ट्रक व फुटपाथ बांधणे. | 24 / सप्टेंबर | 471 / 09/09/2015 | मंजूर |
| 20. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** नेरुळ, सेक्टर-16, 16ए व 18 मध्ये गरजेच्या ठिकाणी विजेच्या दिव्यांचे खांब बसविणे तसेच काही वर्षापूर्वी बसविलेले विजेचे दिवे आणि हायमास्टचे दिवे ज्याचा प्रकाश कमी पडतो त्या सर्व दिव्यांच्या खांब्याबर आणि हायमास्ट वर जास्त प्रकाश देणारे नवीन विजेचे दिवे बसविणे. | 25 / सप्टेंबर | 472 / 09/09/2015 | मंजूर |
| 21. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-** प्रभाग क्र. 29, घणसोली-2 या प्रभागात असलेला तलाव हा "छत्रपती शिवाजी महाराज तलाव" या नावाने ओळखला जात आहे. या तलावात श्री गणपतीचे विसर्जन व देवीचे विसर्जन केले जाते. तलावालगत असलेल्या मोकळया जागेत लहान मुलांना खेळाचे साहित्य 'कवीकटटा' तसेच तलावाच्या सभोवताली जॉगींग ट्रक तयार करुन तलावाचे सुशोभिकरण करणे. | 26 / सप्टेंबर | 473 / 09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 22. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली-2 या प्रभागातील म्हात्रे आळी व बाळारामवाडीच्या पश्चिमेकडे लागुनच सिडको प्राधिकरणाने घणसोली गावासाठी गावांतील विदयार्थी व तरुण खेळाडु यांना विविध खेळासाठी मैदान म्हणुन हा भुखंड सन 1996 पासुन राखुन ठेवला आहे. नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2015 च्या निवडणुकीसाठी तयार केलेल्या प्रभाग रचनेनुसार प्रभाग क्र. 29, घणसोली-2 या प्रभागात हे मैदान येत आहे व "हुतात्मा कै. जगदीश हरिश्चंद्र पाटील" मैदान या नावाने मैदान ओळखले जात आहे. घणसोली गावातील विदयार्थी, तरुण खेळाडु विविध खेळासाठी याचा वापर करित आहेत. सिडको प्राधिकरणाने घणसोली नोडच्या भुखंडाचे वाटप केले आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सिडको प्राधिकरणाकडे घणसोली गावासाठी राखुन ठेवलेल्या या मैदानाच्या भुखंडाची मागणी करुन सदरच्या मैदानासाठी राखुन ठेवलेला भुखंड ताब्यात घ्यावा व या मैदानाला संरक्षक भिंत बांधणे. | 27<br>सप्टेंबर | 474<br>09/09/2015 | मंजूर |
| 23. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगरकडे रेल्वे स्टेशन कडुन येण्या-जाण्याच्या रस्त्यावर रेल्वे ट्रॅक ओलांडताना बरेच अपघात होत आहेत. त्यासाठी सदर ठिकाणी होणारी जिवीत व वित्तहानी टाळण्यासाठी रेल्वे ट्रॅकवर एक उडडाणपुल बनवावे. | 28<br>सप्टेंबर | 475<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 24. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 83, जुईनगरसाठी असलेल्या स्मशानभुमीचे नुतनीकरण करण्याचे काम चालु करण्यापुर्वी नागरिकांकडुन सुचना आल्या की नकाशात दाखविल्याप्रमाणे मयत जाळण्याची जागा दक्षिणेला न बनवता उत्तर दिशेला बनवावी जेणेकरुन मयत जळत असताना तेथे जमलेल्या लोकांना धुर व वास यांचा त्रास होणार नाही. त्यासाठी आर्किटेक्टला नकाशात जरुरीचे फेरबदल करण्यास सांगावे व मयत जाळण्याची जागा उत्तरेला बनवुन सदर काम लवकरात लवकर पुर्ण करणे. | 29<br>सप्टेंबर | 476<br>09/09/2015 | मंजूर |
| 24. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 83, जुईनगरसाठी सुनियोजित मार्केट बांधलेले नाही. भुखंड क्र. 7, 46, 274अ व 278 या राखीव असलेल्या मार्केट व स्टॉल साठीच्या जागांवर लवकरात लवकर सुनियोजित मार्केट व स्टॉल बांधुन उपलब्ध करणे. | 30<br>सप्टेंबर | 477<br>09/09/2015 | मंजूर |
| 25. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर येथे विदयुत वाहिनी भुमिगत करणे. | 31<br>सप्टेंबर | 478<br>09/09/2015 | मंजूर |
| 26. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर विभागातील जुने स्ट्रीट पोल काढुन नवीन एल.ओ.डी. लावणे. | 32<br>सप्टेंबर | 479<br>09/09/2015 | मंजूर |
| 27. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 1, मुकुंद कंपनी ते ईश्वरनगर ते बालीनगर ते सदगुरुनगर येथे मुख्य रस्ते कॉंक्रीटीकरण (R.C.C.) करणे. | 33<br>सप्टेंबर | 480<br>09/09/2015 | मंजूर |
| 28. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59, जुहूगांव-2, से. 11, वाशी, नवी मुंबई येथील गावदेवी मैदानात बसविण्यात आलेल्या बैठक स्टॅंडची दुरुस्ती करुन त्यावर पत्राचे शेड बसविणे. | 34<br>सप्टेंबर | 481<br>09/09/2015 | मंजूर |
| 29. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59, जुहूगांव-2, से. 11, वाशी, नवी मुंबई हिमबिंदू सोसायटी येथे इंटरलॉक बसविणे. | 35<br>सप्टेंबर | 482<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 30. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, जुहूगांव-2, से. 10, वाशी, नवी मुंबई येथील श्रध्दा अपार्टमेंट येथील फुटपाथची दुरुस्ती करुन इंटरलॉक बसविणे. | 36<br>सप्टेंबर | 483<br>09/09/2015 | मंजूर |
| 31. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, से. 19 व 20 मधील उच्च दाबाच्या विदयुत वाहिन्या भुमिगत करणे. | 37<br>सप्टेंबर | 484<br>09/09/2015 | मंजूर |
| 32. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, से. 19 नंदनवन सोसायटी ते गणपती मंदीर व गोदावरी सोसायटी ते अवधुत हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता व गटार हेवी डयुटी ड्रेन करणे. | 38<br>सप्टेंबर | 485<br>09/09/2015 | मंजूर |
| 33. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, से. 19 व 20 हायटेंशन खाली मोकळया भुखंडावर पार्कीगसाठी तसेच खेळाच्या मैदानासाठी जागा मिळावी. | 39<br>सप्टेंबर | 486<br>09/09/2015 | मंजूर |
| 34. | **श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 11, ऐरोलीगाव येथील गावदेवी मैदानाचे सुशोभिकरण करणे. | 40<br>सप्टेंबर | 487<br>09/09/2015 | मंजूर |
| 35. | **श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 11, ऐरोलीगाव, साईनाथवाडी व छत्रपती रहिवाशी संघ कॉलनी येथे सी.सी.टी.व्ही. कमेरे बसविणे. | 41<br>सप्टेंबर | 488<br>09/09/2015 | मंजूर |
| 36. | **श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 22, सेक्टर-8अे, ऐरोली हा नव्याने विकसित होणारा सेक्टर असून सदर भागात पावसाळी नाल्यांची सोय नाही. त्यामुळे कच्ची गटारे काढण्यात आलेली आहेत, त्यामधून पाण्याचा निचरा लवकर होत नाही व मच्छरांचा प्रादुर्भाव होतो. त्यासाठी त्या भागात पक्की पावसाळी नाले बांधणे. | 42<br>सप्टेंबर | 489<br>09/09/2015 | मंजूर |
| 37. | **श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 22 मधील दिवागांव येथील मल:निस्सारण वाहीन्यांची दुरावस्था झालेली असून त्यामुळे वारंवार त्या तुंबतात व तुटलेल्या चेंबर व मल वाहिन्या मधून मैला वाहत असतो तरी सदर मल:निस्सारण वाहिन्या त्वरित बदलणे आवश्यक आहे. त्यामुळे त्वरित हाती घेणे. | 43<br>सप्टेंबर | 490<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 38. | **श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 22 मधील दिवागांव मधील पावसाळी गटारे एम.एस.ई.बी, जलवाहिन्या व विद्युत विभागाने केलेल्या खोदकामामुळे नादुरुस्त झालेल्या आहेत ती नव्याने बांधणे आवश्यक आहे. तरी हे काम त्वरित घेणे. | 44<br>सप्टेंबर | 491<br>09/09/2015 | मंजूर |
| 39. | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात डेंगू, मलेरियाचे रुग्ण मोठया प्रमाणावर आढळुन येत असुन यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. या अनुषगांने महापालिका प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करावी तसेच यास अनुसरुन जनजागृती मोहिम युध्द पातळीवर राबविणे. | 45<br>सप्टेंबर | 492<br>09/09/2015 | सदर ठरावाची सुचना मागे घेतली |
| 40. | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-** नेरुळ, सेक्टर -19, वंडर्स पार्क मध्ये सायन्स पार्कची निर्मिती बी.ओ.टी. तत्वावर करणे. | 46<br>सप्टेंबर | 493<br>09/09/2015 | मंजूर |
| 41. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** दि. 9 मार्च 2015 रोजीच्या तहकूब मा. महासभा, दि. 10 मार्च 2015 रोजी भरवण्यात आलेल्या मा. सभेत विषय क्र. 02, सन 2000 पर्यंतच्या घरांना झोपडयाधारकांना नळ कनेक्शन देताना त्याचबरोबर दि. 10/03/2015 पर्यंतच्या घरांना झोपडयाधारकांना सुध्दा घरोघरी नळ कनेक्शन देण्यात यावे या उपसुचनेसह मंजूर झाला आहे. त्याच अनुषंगाने मा. आयुक्त महोदय दि. 10/03/2015 पर्यंतच्या घरांना झोपडयाधारकांना नळ कनेक्शन देण्याची व्यवस्था करणे. | 47<br>सप्टेंबर | 494<br>09/09/2015 | मंजूर |
| 42. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** प्रभाग क्र. 07 व 08 मागील बाजुस एम.आय.डी.सी. रस्त्यालगत रिक्त जागेवर स्मशानभुमी बांधुन मिळणे. | 48<br>सप्टेंबर | 495<br>09/09/2015 | मंजूर |
| 43. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** प्रभाग क्र. 08, गवतेवाडी-चिंचपाडा करिता वेगळी एम.आय.डी.सी. पाईपलाईन मधुन प्रभागात पाणी पुरवठा करिता मुळ पाणी कनेक्शन मिळवुन देणे. | 49<br>सप्टेंबर | 496<br>09/09/2015 | मंजूर |
| 44. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101 अंतर्गत असणा-या आग्रोळी उडडाणपुला खालील  माजमंदिरामध्ये कायमस्वरुपी ड्रेसिंग रुम व स्वच्छतागृह बांधणे. | 50<br>सप्टेंबर | 497<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 45. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101, आग्रोळी गांव येथील शाळा क्र. 3 च्या इमारतीवर 1 वाढीव मजला उभारणे. | 51 / सप्टेंबर | 498 / 09/09/2015 | मंजूर |
| 46. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** पारसिक हिल वरील नादुरुस्त रस्त्यांचे संपुर्णपणे तात्काळ डांबरीकरण करणे. | 52 / सप्टेंबर | 499 / 09/09/2015 | मंजूर |
| 47. | **सौ. मुद्रीका मधुकर गवळी, यांजकडून :-** प्रभाग क्रमांक 70 परिक्षेत्रातील ठाणे-बेलापूर रस्ता ओलांडताना शाळकरी विदयार्थी तसेच चाकरमनी यांची मोठया प्रमाणावर हेळसांड होते. सदर परिक्षेत्रात शाळा, रेल्वे स्थानक, कृषि उत्पन्न बाजारपेठ, एम.आय.डी.सी. क्षेत्र असल्याने मोठया प्रमाणावर वर्दळ आहे. तरी आंबेडकर रोड व के.के. आर. रोड या ठिकाणी स्कायवॉक बांधणे. | 53 / सप्टेंबर | 500 / 09/09/2015 | मंजूर |
| 48. | **सौ. मुद्रीका मधुकर गवळी, यांजकडून :-** प्रभाग क्रमांक 70 येथे बांधण्यात आलेले सुलभ शौचालय काही संस्थाना 30 वर्षासाठी देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आलेले असुन सदर शौचालयाची देखभाल दुरुस्ती, साफसफाई नियमानुसार होत नाही. तरी संबंधित संस्थेचा ठेका रदद करुन येथील स्थानिक महिला बचत गट तसेच सामाजिक संस्था यांना देण्यात यावा. त्यामुळे त्यांना रोजगार मिळेल व स्थानिक प्रतिनिधीचे त्यावर अंकुश राहील. | 54 / सप्टेंबर | 501 / 09/09/2015 | मंजूर |
| 49. | **सौ. मुद्रीका मधुकर गवळी, यांजकडून :-** प्रभाग क्रमांक 70 येथील तुर्भे स्टोअर मधील एम.एस.ई.बी. च्या ओव्हरहेड विदयुत वाहिन्यांमुळे जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विविध ठिकाणी विदयुत पोल खराब झालेले आहेत. काही ठिकाणचे विदयुत पोल झुकलेल्या परिस्थितीत आहेत. तरी सदरचे ओव्हरहेड विदयुत वाहिन्या भुमिगत करणे. | 55 / सप्टेंबर | 502 / 09/09/2015 | मंजूर |
| 50. | **सौ. अनिता सुरेश मानवतकर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 25 मधील तळवली नाका येथे झोपडपटटी भागासाठी झोपडपटटी पुर्नवसन योजना राबवावी. तसेच आदिवासी नागरिकांसाठी पुर्नवसन योजना राबविणे. | 56 / सप्टेंबर | 503 / 09/09/2015 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 51. | **सौ. अनिता सुरेश मानवतकर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 25 मधील रबाळे रेल्वे स्टेशन समोर स्कायवॉक आहे. परंतु सदरहु स्कायवॉकचा विस्तार रेल्वे लाईन ओलांडुन गोठिवली गावाकडे वाढविणे. | 57 / सप्टेंबर | 504 / 09/09/2015 | मंजूर |
| 52. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर 2, सी.बी.डी. येथील अलबेला हनुमान मंदीर ते रेखा फोटो स्टुडीओ पर्यंत पदपथाची दुरुस्ती करणे. | 58 / सप्टेंबर | 505 / 09/09/2015 | मंजूर |
| 53. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर 3, सी.बी.डी. भारती विदयापीठ प्राथमिक शाळेसमोरील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 59 / सप्टेंबर | 506 / 09/09/2015 | मंजूर |
| 54. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102 मधील सुखलेली झाडे व धोकादायक झाडे यांच्या फांदया व पुर्णपणे सुखलेल्या झाडांची विल्हेवाट लावणे. | 60 / सप्टेंबर | 507 / 09/09/2015 | मंजूर |
| 55. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27, तळवली नाका येथील झोपडपटटी (नोसिल नाका) येथे एस.आर.ए. (SRA) योजना राबवुन झोपडपटटींचे पुर्नवसन करणे. | 61 / सप्टेंबर | 508 / 09/09/2015 | मंजूर |
| 56. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27, तळवली नाका येथील आंबेडकर चौक येथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे. | 62 / सप्टेंबर | 509 / 09/09/2015 | मंजूर |
| 57. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27 मध्ये अर्जुनवाडी येथे नाल्याजवळ एमएसईबी मार्फत जे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आलेले आहेत त्यांना सुरक्षा कंपाऊंड बांधणे. | 63 / सप्टेंबर | 510 / 09/09/2015 | मंजूर |
| 58. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील,यांजकडून :-** प्रभाग क्र. 28, सेक्टर-21 मधील भुखंड क्रमांक 1 वर शाळेसाठी खेळाचे मैदान बनविणे. | 64 / सप्टेंबर | 511 / 09/09/2015 | मंजूर |
| 59. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील,यांजकडून :-** प्रभाग क्र. 28, सेक्टर-21 मध्ये भुखंड क्रमांक 85 येथे उदयान बनविणे. | 65 / सप्टेंबर | 512 / 09/09/2015 | मंजूर |
| 60. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील,यांजकडून :-** प्रभाग क्र. 28 मध्ये गायत्री अपार्टमेंट येथे हायमास्ट लावणे. | 66 / सप्टेंबर | 513 / 09/09/2015 | मंजूर |
| 61. | **श्रीम.सिमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-** घणसोली गावाची ओळख दाखविणारे गावाच्या नावाचे प्रवेशद्वार उभारणे. | 67 / सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 62. | **श्रीम.सिमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 31, घणसोली-1 या प्रभागात पायवाट दुरुस्ती करुन तेथे इंटरलॉक बसविणे. | 68 सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 63. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेची सुंदर इमारत पुर्ण भारतात प्रशासकीय इमारतींमध्ये उल्लेखनीय आहे. सदर इमारत नवी मुंबईकरांचा सन्मान वाढविणारी वास्तु ठरली आहे. म्हणुनच नवी मुंबई महानगरपालिका पदाधिकारी सदस्य, अधिकारी यांचे व्हिजिटींग कार्ड, लेटरहेड व शास्ती (फाईलवर) मुख्यालयाच्या फोटोचा अंतर्भाव करणे. | 69 सप्टेंबर | 514 09/09/2015 | मंजूर |
| 64. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका परिसरात सिडकोने प्रकल्पग्रस्तांकडून संपादित केलेल्या जमिनींवर कित्येक संस्थांनी शाळा, महाविदयालये काढण्याकरीता अत्यंत अल्पदराने (नाममात्र) भुखंड घेतले असुनही संबंधित शाळा, महाविदयालयांनी येथील स्थानिक मुलांना प्रवेशाबाबत नकारात्मक भुमिका तसेच अल्पसंख्यांक कोटा सांगुन भाषिक भेदभावाने प्रवेशामध्ये दुटप्पी भुमिका मांडलेली आहे. सदर भुमिका रास्त आहे की नाही याची शिक्षणमंडळाच्या वतीने सखोल चौकशी करणे. | 70 सप्टेंबर | 515 09/09/2015 | मंजूर |
| 65. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-** एम.आय.डी.सी. परिसरातील कामगारांची संख्या पाहता तेथील लोकांच्या सोयीसाठी अभ्यासपुर्ण वेळापत्रक आखुन परिवहन विभागाने रिंगरुट बससेवा सुरु करणे. | 71 सप्टेंबर | 516 09/09/2015 | मंजूर |
| 66. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रमांक 85, सेक्टर-6, सारसोळे गाव येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 72 सप्टेंबर | 517 09/09/2015 | मंजूर |
| 67. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रमांक 85, सेक्टर-6, सारसोळे गाव येथील पथदिव्यांची झालेली दुरावस्था पाहता नविन व अधिक प्रकाश देणारे दिवे लावणे. | 73 सप्टेंबर | 518 09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 68. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रमांक 85, कुकशेत गांव व सारसोळे गांव सेक्टर-6 परिसरातील मुख्य रस्ते व चौकात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविणे. | 74 / सप्टेंबर | 519 / 09/09/2015 | मंजूर |
| 69. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103 अंतर्गत असणा-या सार्वजनिक ठिकाणी ई-टॉयलेट व्यवस्था उभारणे. | 75 / सप्टेंबर | 520 / 09/09/2015 | मंजूर |
| 70. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103 अंतर्गत असणारी शाळा क्रमांक 4 विदयार्थ्यांचे भविष्य आहे, त्यास्थितीत संपुर्ण इंग्रजी माध्यम किमान दहावी इयत्ता पर्यंत येत्या शैक्षणिक वर्षात तात्काळ कार्यान्वित करणे. | 76 / सप्टेंबर | 521 / 09/09/2015 | मंजूर |
| 71. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, सीबीडी विभागातील पालिकेचे नागरी आरोग्य केंद्र सर्वसुविधायुक्त 24 तास ओ.पी.डी. सेवा तात्काळ कार्यान्वित करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे. | 77 / सप्टेंबर | 522 / 09/09/2015 | मंजूर |
| 72. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील जुनी अडवली-भुतवली वस्तीवर येण्या-जाण्याकरीता एक नाला आहे. तरी सदर ठिकाणी नागरिकांना येण्या-जाण्याकरिता कुठल्याही प्रकारची व्यवस्था नाही. तरी त्यांची सहजीवन जगताना अत्यंत तारांबळ होते. मानवी रहदारीच्या दृष्टिने विचार करता तेथे एक मोरी बांधण्यात यावी. त्यांच्या घरापर्यंत रस्ता बांधणे. | 78 / सप्टेंबर | 523 / 09/09/2015 | मंजूर |
| 73. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील जुन्या अडवली-भुतवली वस्तीवर विदयुत पुरवठा व पाणी पुरवठा करणे. | 79 / सप्टेंबर | 524 / 09/09/2015 | मंजूर |
| 74. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील संभाजीनगर, वारलीपाडा येथील स्मशानभुमी दुरुस्ती करणे. | 80 / सप्टेंबर | 525 / 09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 75. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97, सेक्टर-18 मध्ये प्रबोधनकार ठाकरे रॉक गार्डन आहे. त्याची संरक्षण भिंतीची उंची जास्त असल्यामुळे त्या ठिकाणी काही तरुण मुले/मुली अश्लिल चाळे करतात. तसेच काही मुले व माणसे मदय प्राशन करत असतात. त्याचा आजुबाजूच्या सोसायटयांना व रहिवाशांना नाहक त्रास होत आहे. त्याठिकाणी शक्ती मिल सारखी एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्या संरक्षण भिंतीची उंची कमी करुन ग्रीलचे रेलींग करणे. | 81<br>सप्टेंबर | 526<br>09/09/2015 | मंजूर |
| 76. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** सेक्टर-18 शिवाजी चौक ते सेक्टर-18ए चांगा ठाकुर चौक या रस्त्यावर नेहमी वाहतूक कोंडी होत आहे. त्याचा त्रास से. 16, 16ए, 18, 18ए मधील रहिवाशांना व व्यवसायिकांना होत आहे. तरी महापालिकेने रस्त्याच्या दोन्ही बाजुचे फुटपाथची रुंदी कमी करणे. | 82<br>सप्टेंबर | 527<br>09/09/2015 | मंजूर |
| 77. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97, सेक्टर-18 मध्ये सागर दर्शन टॉवरच्या समोरील फुटपाथला लागुन ओपन नाला (गटार) आहे. त्यामुळे ब-याच वेळा ज्येष्ठ नागरिकांना फुटपाथवर चढण्यास व उतरण्यास त्रास होत असून त्याठिकाणी अपघात झाले आहेत. त्यामुळे तो नाला भूमीगत करणे. | 83<br>सप्टेंबर | 528<br>09/09/2015 | मंजूर |
| 78. | **सौ. शशिकला कुमार मालादी, यांजकडून :-** प्लॉट नं. 1, सेक्टर 29 मध्ये 600 मीटर भुखंड पार्किंगसाठी रिकामा ठेवला आहे. त्या भुखंडाला सब डिव्हीजन करुन 500 मीटर मध्ये बहुउददेशीय इमारत बांधणे. | 84<br>सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 79. | **सौ. शशिकला कुमार मालादी, यांजकडून :-** नेरुळ रेल्वे स्टेशन (पुर्व) जवळ असलेल्या रिक्षा स्टँड जवळील मोकळया भुखंडावर स्वच्छता अभियान अंतर्गत महिला व पुरुषासाठी सार्वजनिक शौचालय बांधणे. | 85<br>सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 80 | **सौ. शशिकला कुमार मालादी, यांजकडून :-** प्लॉट नं. 10, सेक्टर 29 मधील वाहन पार्किंग लगत स्वच्छता अभियान अंतर्गत महिला व पुरुषासाठी सार्वजनिक शौचालय बांधणे. | 86<br>सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 81. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 30, घणसोली मधील से. 16 मधील भुमिराज सोसायटी पुढच्या बाजुपासुन ते श्री धनाजी पाटील कौलआळी यांच्या घरापर्यंतचे हेवी डयुटी गटाराचे बांधकाम नव्याने करणे. | 87<br>सप्टेंबर | 529<br>09/09/2015 | मंजूर |
| 82. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 30, घणसोली भूमिराज सोसायटी से. 16 पासून ते से. 21 कडे जाणा-या रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली आहे. त्यामुळे सदरच्या रस्त्याचे काम तातडीने करणे. | 88<br>सप्टेंबर | 530<br>09/09/2015 | मंजूर |
| 83. | **श्री. संजु आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथे बी ग्रुपला लागुन व बौध्द विहाराच्या मागील जागेत तरुण मुला-मुलींसाठी व्यायामशाळा बांधणे. | 89<br>सप्टेंबर | 531<br>09/09/2015 | मंजूर |
| 84. | **श्री. संजु आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12 मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयान आहे. त्या उदयानामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयान असे चांगल्या पध्दतीने गेट तयार करणे. | 90<br>सप्टेंबर | 532<br>09/09/2015 | मंजूर |
| 85. | **श्री. संजु आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12 मध्ये शालेय विदयार्थ्यांना व प्रभागातील मुला-मुलींना खेळण्यासाठी प्रशस्त क्रिडांगणाची गरज आहे, परंतु असे कुठलेही क्रिडांगण महानगरपालिकेच्या मालकीचे नाही. परंतु ज्ञानदिप हायस्कुलचे जे मोठे क्रिडांगण आहे त्या क्रिडांगणाची चांगल्या पध्दतीने डागडुजी करुन आमच्या प्रभागातील समस्या दुर होऊ शकेल. तरी त्या क्रिडांगणाची योग्य ती डागडुजी करुन मुला-मुलींना खेळण्यासाठी प्रशस्त क्रिडांगण तयार करणे. | 91<br>सप्टेंबर | 533<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 86. | **सौ. अंजली अजय वाळुंज, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 62 मधील से.16ए मधील जुने दयनीय अवस्थेत असलेले पदपथ व गटारे नव्याने बनविणे. | 92<br>सप्टेंबर | 534<br>09/09/2015 | मंजूर |
| 87. | **सौ. अंजली अजय वाळुंज, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 62 मधील फायरब्रिगेड ते बी/3/24 से. 15, गावदेवी मंदिराकडे जाणा-या रस्त्यावरील गटार व पदपथ नव्याने बांधणे. | 93<br>सप्टेंबर | 535<br>09/09/2015 | मंजूर |
| 88. | **सौ. अंजली अजय वाळुंज, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 62 मधील नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत ज्यु. कॉलेज सुरु करण्यात यावे जेणेकरुन स्थानिक विदयार्थ्यांना विदयालयीन (कॉलेज) प्रवेशाबाबत गंभीर प्रश्न सुटेल. | 94<br>सप्टेंबर | 536<br>09/09/2015 | मंजूर |
| 89. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 35 मधील सेक्टर-9 येथील घरोंदा वसाहतीच्या बाहेरील विविध पदपथांवर पेव्हर ब्लॉक बसवुन नवीन सुधारणा करणे. | 95<br>सप्टेंबर | 537<br>09/09/2015 | मंजूर |
| 90. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 35 मधील सेक्टर-7 व सेक्टर-9, सिम्पलेक्स-घरोंदा वसाहती मधील ड्रेनेज लाईन खराब झाल्या असुन नवीन ड्रेनेज लाईन करणे. | 96<br>सप्टेंबर | 538<br>09/09/2015 | मंजूर |
| 91. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 35, घणसोली, घरोंदा श्री. गणेश सोसायटी व ओमकार सोसायटी यांना लागुन असणारा सर्कल लहान करुन विकसित करणे. | 97<br>सप्टेंबर | 539<br>09/09/2015 | मंजूर |
| 92. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>सानपाडा, सेक्टर 10 येथे भुखंड क्र. 24 व 25 मार्केटसाठी आरक्षित आहे. तेथे अदयावत मार्केट उभारणे. | 98<br>सप्टेंबर | 540<br>09/09/2015 | मंजूर |
| 93. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>सानपाडा, सेक्टर 11 येथे वाचनालयासाठी आरक्षित भुखंड आहे. तेथे अदयावत वाचनालय उभारावे (भुखंड क्र. 1). | 99<br>सप्टेंबर | 541<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 94. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-** सानपाडा, सेक्टर 10 येथे भुखंड क्र. 187 समाजमंदीरासाठी भुखंड आहे. दोनवेळा भुमिपुजन झालेले आहे. तरी लवकरात लवकर समाजमंदीर बांधणे. (लोकशाहीर अण्णाभाऊ साठे भवन) | 100<br>सप्टेंबर | 542<br>09/09/2015 | मंजूर |
| 95. | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 05, इलठणपाडा येथील समाजमंदिराच्या जागेवर बहुउददेशीय इमारत बांधणे. | 101<br>सप्टेंबर | 543<br>09/09/2015 | मंजूर |
| 96. | **श्री. लिलाधर गणपत नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 50, कोपरखैरणे, बोनकोडे येथील मासळी मार्केट, अंगणवाडी तसेच गुरांचा दवाखाना आहे. सदर दवाखान्यात नवी मुंबई म्हणजेच पुर्वीचा बेलापुर विभाग येथील शेतक-यांच्या जमिनी शासनाने विकसित केल्याने शेती काम बंद झाले. त्यामुळे शेतीचे काम करण्यासाठी लागणा-या गुरांचे अस्तित्व देखील कायमचे बंद झाले. त्यामुळे गुरांचा जो दवाखाना आहे त्या गुरांच्या दवाखान्याचा ताबा शासनाकडे आहे. सदर दवाखान्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने पत्रव्यवहार करुन सदर दवाखान्याची जमीन नवी मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करुन घ्यावी. सदर ठिकाणी एक बहुउददेशीय इमारत बांधण्यात यावी. सदर इमारतीमध्ये तळमजल्यावर मासळी मार्केट, वरील मजल्यावर जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तसेच बोनकोडे गावात श्री. विठठल रुखमाई मंदिर व गांवदेवी मंदिरात वर्षेभर जे उत्सव साजरे होतात. सदर उत्सवासाठी जे भाविक, वारकरी मंडळी, किर्तनकार येत असतात त्यांना नैसर्गिक विधी तसेच आराम करण्यासाठी या बहुउददेशीय इमारतीत त्यांची आसन व्यवस्था करणे. | 102<br>सप्टेंबर | 544<br>09/09/2015 | मंजूर |
| 97. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 95, नेरुळ गाव येथील श्री. विकास ठाकुर यांच्या घरापासुन श्री. अशोक म्हात्रे यांच्या घरापर्यंत गटार बांधणे. | 103<br>सप्टेंबर | 545<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 98. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 95, नेरुळ गाव येथील मुख्य चौकांमध्ये सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. | 104<br>सप्टेंबर | 546<br>09/09/2015 | मंजूर |
| 99. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 95, नेरुळ, सेक्टर 20 येथील दिशा अपार्टमेंट पासुन ते शिवत्रिवेणी अपार्टमेंट पर्यंत गटाराची सुधारणा व पदपथ तयार करणे. | 105<br>सप्टेंबर | 547<br>09/09/2015 | मंजूर |
| 100. | **श्री. सुरेश शिवाजी कुलकर्णी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 68 मध्ये एम.एस.ई.बी. चे पोल जवळपास 15 ते 20 वर्षापासुनचे जुने आहेत. येथील विदयुत खांब सडलेले आहेत. काही ठिकाणी विदयुत खांब झुकलेले आहेत. त्यामुळे केबल तुटुन जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरचे एम.एस.ई.बी. चे ओव्हरहेड विदयुत वाहिन्या भुमिगत करणे. | 106<br>सप्टेंबर | 548<br>09/09/2015 | मंजूर |
| 101. | **श्री. सुरेश शिवाजी कुलकर्णी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 68 मधील डंपिंग ग्राऊंडच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार आणि अस्फाल्टींग करणे. | 107<br>सप्टेंबर | 549<br>09/09/2015 | मंजूर |
| 102. | **सौ. राधा सुरेश कुलकर्णी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 73 मध्ये इंदिरानगर, गणेशनगर, आंबेडकरनगर, बोनसरी गांव या परिसरातील ओव्हरहेड विदयुत वाहिन्यांमुळे अनेक अपघात झालेले आहेत. पावसाळयामध्ये विदयुत खांब कोसळुन अनेक जीव गेलेले आहेत. याकरीता सदरचे ओव्हरहेड वाहिन्या भुमिगत करणे. | 108<br>सप्टेंबर | 550<br>09/09/2015 | मंजूर |
| 103. | **सौ. राधा सुरेश कुलकर्णी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 73, आंबेडकरनगर परिसर हा औदयोगिक पटटयामध्ये येत असल्याने येथे अवजड वाहनांची सतत ये-जा असते. या ठिकाणचे रस्ते खराब झालेले आहेत. तरी डी-293 व डी-268 येथील रस्त्याचे अस्फाल्टींग करुन रस्ते बनविणे. | 109<br>सप्टेंबर | 551<br>09/09/2015 | मंजूर |
| 104. | **श्रीम. भारती मंगळया कोळी, यांजकडून :-**<br>दिवाळे गावातील मच्छीमार्केट तोडुन नविन बांधणे. | 110<br>सप्टेंबर | 552<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 105. | **श्रीम. भारती मंगळया कोळी, यांजकडून :-** से. 11 येथील गटर आणि फुटपाथ नविन बांधणे. | 111 / सप्टेंबर | 553 / 09/09/2015 | मंजूर |
| 106. | **श्रीम. भारती मंगळया कोळी, यांजकडून :-** से. 19 येथील रस्त्याची दुरुस्ती करणे. | 112 / सप्टेंबर | 554 / 09/09/2015 | मंजूर |
| 107. | **सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 106 मधील मोडकळीस आलेली नवी मुंबई महानगरपालिकेची सुलभ शौचालये नव्याने बांधणे. | 113 / सप्टेंबर | 555 / 09/09/2015 | मंजूर |
| 108. | **सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 106 मधील बेलापुर गावच्या पश्चिमेकडील उरण हायवे रोड थांबा ते बेलापुर गाव बस थांबा अशा उरण-दादर रोडवर स्कायवॉक बांधणे. | 114 / सप्टेंबर | 556 / 09/09/2015 | मंजूर |
| 109. | **सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-** बेलापुर गाव से-20 येथील रस्त्यांचे दुरुस्ती करुन डांबरीकरण करणे. | 115 / सप्टेंबर | 557 / 09/09/2015 | मंजूर |
| 110. | **श्री.सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 74 मधील सानपाडा सेक्टर 10 आणि सेक्टर 6 मधील सर्व पदपथांची दुरुस्ती करणे. | 116 / सप्टेंबर | 558 / 09/09/2015 | मंजूर |
| 111. | **श्री.सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 74 मधील सानपाडा सेक्टर 10 येथे अभ्यासिका केंद्र उभारणे. | 117 / सप्टेंबर | 559 / 09/09/2015 | मंजूर |
| 112. | **श्री.सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 74 मधील सानपाडा सेक्टर 6 येथील सिडको वाणिज्य क्षेत्रातील नियोजीत सुलभ शौचालय भुखंडावर सुलभ शौचालय तसेच स्नानगृह उभारणे. | 118 / सप्टेंबर | 560 / 09/09/2015 | मंजूर |
| 113. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 75 मधील विकास पाटील चौकासमोर आरक्षित भुखंडावर उदयान उभारणे. | 119 / सप्टेंबर | 561 / 09/09/2015 | मंजूर |
| 114. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 75 मध्ये पारसिक बँक, सानपाडा अंडरपास, श्री. गजानन महाराज चौक या ठिकाणी विदयुत हायमास्ट उभारणे. | 120 / सप्टेंबर | 562 / 09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 115. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 75 गावदेवी मैदान ते सानपाडा रेल्वे स्टेशन पर्यंतच्या पदपथाची दुरुस्ती करुन नवीन पदपथ तयार करणे. | 121 सप्टेंबर | 563 09/09/2015 | मंजूर |
| 116. | **श्रीम. संगीता राजबली यादव, यांजकडून :-** प्र. क्र. 06, यादवनगर, देवीधामनगर येथे गटर व पदपथ बनविणे. | 122 सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 117. | **श्रीम. संगीता राजबली यादव, यांजकडून :-** प्र. क्र. 06, यादवनगर येथे मोठी पाईपलाईन (जलवाहिनी) टाकणे. | 123 सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 118. | **श्रीम. संगीता राजबली यादव, यांजकडून :-** प्र. क्र. 06, यादवनगर, जयभवानीनगर येथे गटर दुरुस्ती करणे. | 124 सप्टेंबर | 09/09/2015 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 119. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 86, सारसोळे व परिसरातील नागरिकांचे श्रध्दास्थान असणारे बामणदेव हे ठिकाण धारण तलावाकडे जाणा-या रस्त्यालगत असल्याने या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 125 सप्टेंबर | 564 09/09/2015 | मंजूर |
| 120. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 86, सेक्टर-6 येथील उदयानातील असलेली दुरावस्था सुधारणे. | 126 सप्टेंबर | 565 09/09/2015 | मंजूर |
| 121. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 86, सारसोळे गांव सेक्टर-6 परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 127 सप्टेंबर | 566 09/09/2015 | मंजूर |
| 122. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 80, मधील महात्मा गांधीनगर, रमेश मेटल क्वारी या परिसरातील सन 2000 पर्यंतचे अधिकृत झोपडीधारकांस महाराष्ट्र शासन निर्णयानुसार घरोघरी नळ योजना अंतर्गत महात्मा गांधीनगर येथे ओव्हर टक्र बांधून रहिवाशांना पाणी पुरवठा करणे. | 128 सप्टेंबर | 567 09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 123. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 80, येथील एल.पी. नाका जक्शन येथे सार्वजनिक शौचालय व प्रवाशी निवारा शेड नसल्यामुळे येथे प्रवाशांचे व औदयोगिक परिसरात जाणारे महिला नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यांच्या सुविधेकरीता शौचालय व प्रवाशी निवारा शेड बांधणे. | 129<br>सप्टेंबर | 568<br>09/09/2015 | मंजूर |
| 124. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 80, मधील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 16 मधील विदयार्थी शाळेचा पट दरवर्षीप्रमाणे वाढत आहे. विदयार्थी यांना बसण्याकरीता वर्ग अपुरा पडत आहेत. त्यामुळे प्रभागातील विदयार्थांना शाळेमध्ये प्रवेश नाकारले जात आहे. विदयार्थ्यांच्या सुविधेकरीता शाळेवरील छतावर पत्र्यांचे शेड बांधुन चार वर्ग उभारणे. | 130<br>सप्टेंबर | 569<br>09/09/2015 | मंजूर |
| 125. | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमामध्ये शालेय विद्यार्थी मासिक पासमध्ये केलेली अवास्तव भाडेवाढ कमी करणे. | 131<br>सप्टेंबर | 570<br>09/09/2015 | मंजूर |
| 126. | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रात मोठया प्रमाणात अनधिकृतपणे डेब्रीज टाकले जात असून त्याला पायबंद घालणे. | 132<br>सप्टेंबर | 571<br>09/09/2015 | मंजूर |
| 127. | **श्री. सुनील बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्रमांक 92, दारावे येथे जिल्हा परिषद कालावधीतील व्यायामशाळा बांधण्यात आली असुन सदर व्यायामशाळा नादुरुस्त झालेली आहे. अशा स्थितीत परिसरातील युवक सदर व्यायामशाळेत व्यायाम करण्यासाठी येत असतात. त्यांच्या जिवितेला धोका निर्माण होऊ नये म्हणून आपण सदर जागेची पाहणी करुन त्याठिकाणी युवकांसाठी सुसज्ज व्यायामशाळा, जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र व वाचकांसाठी वाचनालय अशी सुसज्ज दुमजली इमारत बांधणे. | 133<br>सप्टेंबर | 572<br>09/09/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 128. | **श्री. सुनील बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्रमांक 92, दारावे येथे काही ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी कच्चा नाला करण्यात आला आहे. तसेच काही ठिकाणी गटारे नादुरुस्त झालेली आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा बरोबर होत नाही. परिणामी पाणी साठून डासांची उत्पत्ती होते. म्हणून त्याठिकाणी पक्का स्वरुपाची आर.सी.सी. गटारे बांधणे. | 134<br>सप्टेंबर | 573<br>09/09/2015 | मंजूर |
| 129. | **श्री. सुनील बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्रमांक 92, दारावे येथे रेल्वे फाटक बंद करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना पलिकडे जाण्यासाठी दोन किलोमीटर अंतर चालत जावे लागते. परिणामी नागरिक रेल्वे क्रॉसिंगचा उपयोग करुन घेत आहेत. त्यामुळे अनेकवेळा अपघात होऊन जिवितहानी झालेली आहे. रेल्वे प्रशासनाने फाटक बंदचा पर्याय म्हणून अंडरपास व्यवस्था करुन ठेवण्यात आली आहे. तरी सदर जागेची पाहणी करुन भविष्यामध्ये जिवितहानी होऊ नये म्हणून अंडरपास रस्ता तयार करणे. | 135<br>सप्टेंबर | 574<br>09/09/2015 | मंजूर |